महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# कार्यालय, पोलीस अधीक्षक, यवतमाळ

एल.आय.सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोडः ४४५००१
Email:- sp.yavatmal@mahapolice.gov.in

---

## पोलीस शिपाई भरती -२०२१

### गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांची मुळ कागदपत्रे तपासणी

यवतमाळ जिल्हा पोलीस आस्थापनेवरील **"पोलीस शिपाई"** यांची प्रवर्गनिहाय २४४ रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरु असून **"तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी"** ही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे फेर पडताळणी व भरती निकषाची पुर्तता यांच्या अधीन राहून तयार करण्यात आली असून दिनांक १८/०४/२०२३ रोजी पोलीस कवायत मैदान, पळसवाडी, दारव्हा रोड, यवतमाळ येथील नोटीस बोर्डवर तसेच या कार्यालयाचे संकेतस्थळावर www.yavatmalpolice.gov.in यावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर पोलीस शिपाई भरती-२०२१ प्रक्रियेतील तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी ही **प्रेरणा सभागृह, पोलीस मुख्यालय, यवतमाळ** येथे होणार आहे. त्याकरिता तात्पुरती निवड (Provisional Selection List) यादीमधील २४४ उमेदवारांनी खालील नमूद तारखेस कागदपत्रासह कागदपत्र पडताळणीसाठी वेळेत हजर राहावे.

| अ.क्र. | प्रवर्ग | उमेदवारांची संख्या | दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | खुला | ८४ | दि. २५/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता | प्रेरणा सभागृह, पोलीस मुख्यालय, यवतमाळ. |
| २. | अ.जा.अ.ज.वि.जा.अ भ.ज.ब भ.ज.क. | ८५ | दि. २६/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता | प्रेरणा सभागृह, पोलीस मुख्यालय, यवतमाळ. |
| ३. | भ.ज.ड. वि.मा.प्र. इ.मा.व.इडब्ल्युएस | ७५ | दि. २७/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता | प्रेरणा सभागृह, पोलीस मुख्यालय, यवतमाळ. |

## उमेदवारांसाठी सूचना

**उमेदवारांनी ऑनलाईन आवेदन अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेली व आवश्यक ती सर्व मुळ (ORIGINAL) कागदपत्रे सोबत घेऊन येणे अनिवार्य**

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १ | १० वी, १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक/सनद/टि.सी. |
| २ | उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे |
| ३ | जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र |
| ४ | संगणक अर्हता प्रमाणपत्र |
| ५ | EWS प्रमाणपत्र |
| ६ | नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| ७ | खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता ३०% आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व प्रगत गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे परिशिष्ट **"फ" प्रमाणपत्र** |
| ८ | अधिवास प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र |
| ९ | जन्म तारखेबाबतचे प्रमाणपत्र (जन्म दाखला/१० वी बोर्ड सर्टिफिकेट/ शाळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईड/ |
| १० | आधारकार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना ओळखपत्र |
| ११ | आवेदन अर्जात नमूद केलेले समांतर आरक्षणबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे व सर्व वैध कागदपत्रे/प्रमाणपत्र/(खेळाडू,प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त,पोलीस पाल्य,अशंकालीन,होमगार्ड,माजी सैनिक, |
| १२ | आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य प्रमाणपत्र |
| १३ | उमेदवार शासकीय सेवेत अथवा निमशासकीय सेवेत नोकरीस असल्यास त्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र |
| १४ | उमेदवारांनी शारीरिक चाचणी, लेखी परीक्षाकरिता देण्यात आलेले मुळ प्रवेशपत्र (त्यावर या कार्यालयाचा शिक्का असलेले) सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे. |
| १५ | ४ पासपोर्ट साईज फोटो |
| १६ | ऑनलाईन आवेदन अर्जाची कलर सुस्पष्ट साक्षांकित प्रत (त्यामध्ये Application ID नमूद असावा) सोबत घेऊन येणे अनिवार्य |
| १७ | उमेदवारांनी **NCC "C" प्रमाणपत्र** सोबत घेऊन येणे अनिवार्य |
| १८ | इतर आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्र |

- सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional Selection List) असेल. निवड यादीमध्ये नावांचा समोवश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- तात्परुती निवड यादी (Provisional Selection List) मधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे ही विहित शासन निर्णय, परिपत्रके व पोलीस भरती कार्यपध्दतीमधील निर्देशानुसार फेर पडताळणी झाल्यानंतर अंतिम निवड यादी (Final Selection List) तयार करण्यात येणार आहे.
- तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) व तात्पुरती प्रतिक्षा यादी (Provisional Waitaing List) मधील निवड ही भरती निकषांची पुर्तता यांच्या अधीन असल्याने त्यामध्ये उमेदवार अपात्र झाल्यास त्यांचे नाव रद्द करण्यात येईल. याबाबत उमेदवारांचा कोणताही दावा/तक्रार/हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.
- कागदपत्र पडताळणीच्या वेळी मुळ कागदपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र करण्यात येईल.
- कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवार गैरहजर राहील्यास त्यांचे नाव तात्पुरत्या निवड यादीतून वगळण्यात येईल.
- पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

**(डॉ. पवन बन्सोड)**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.